महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळकोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४

**महत्वाचे / परीक्षा प्राधान्य**

क्र.कोविमं/ माध्य.गोप /उ.प.तपासणी/ 2184.
दिनांक : ०१.११.२०२२

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
जिल्हा सातारा, सांगली,कोल्हापूर.

विषय : माध्यमिक शालांत [ इयत्ता १० वी ] प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२३
परीक्षक/नियामक नेमणुक तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात शिक्षक माहिती पाठविणेबाबत
संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र.कोविमं/ माध्य.गोप /उ.प.तपासणी/ ९२७/ दिनांक ०४.१०.२०२२

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ पत्र पहावे.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता १० वी परीक्षा मार्च २०२३परीक्षेसाठी प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणी कामासाठी परीक्षक / नियामक तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत-बहिस्थ परीक्षक नेमणूकीसंदर्भात आपल्या शाळेकडे कार्यरत विषय शिक्षकांची विहीत माहितीची यादी पडताळणी तथा दुरुस्ती करुन दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ अखेर या कार्यालयाकडे हस्तपोहोच/ टपालाद्वारे सादर करण्याबाबत या कार्यालयाच्या दिनांक ०४.१०.२०२२ च्या संदर्भ पत्रान्वये सूचित करण्यात आलेले आहे.

तथापि इयत्ता १० वी मार्च २०२२ परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची **मुळ प्रमाणपत्रे शुक्रवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२२** रोजी जिल्हा वितरण केंद्रावर हस्तपोहोच वाटप केली जाणार आहेत. त्याच दिवशी वरीलप्रमाणे शिक्षकांची विहीत माहिती जिल्हा वितरण केंद्रावर हस्तपोहोच स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.ज्या शाळांनी अद्यापि शिक्षकांची विहीत माहिती या कार्यालयाकडे सादर केलेली नाही त्यांनी माहिती टपालामार्फत न पाठवता मार्च २०२२ परीक्षेची प्रमाणपत्रे स्वीकारण्याच्या दिवशी म्हणजेच **दिनांक ११ नोव्हेंबर २०२२** रोजी त्या-त्या जिल्हा वितरण केंद्रावर हस्तपोहोच जमा करावयाची आहे.

**महत्वाची सूचना : ज्या शाळांनी अद्यापि शिक्षकांची विहीत माहिती या कार्यालयाकडे सादर केलेली नाही त्यांच्याकडून माहिती वितरण केंद्रावर जमा केल्यानंतरच मूळ प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत याची नोंद घ्यावी.**

[डी.एस.पोवार ]
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

**प्रत- माहितीस्तव तथा कार्यवाहीसाठी**

वितरण केंद्रप्रमुख यांना कळविण्यात येते की, सदरची माहिती संकलित करुन **सोमवार दिनांक १४/११/२०२२** रोजी मंडळ कार्यालयात प्रतिनिधी मार्फत हस्तपोच जमा करावी.